प्रेसनोट दिनांक २८/०१/२०२६

## लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई यांची यशस्वी सापळा कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभाग/घटक | :- | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नवी मुंबई |
| २. | ठाणे दैनंदिनी नोंद कमांक . | :- | नेरूळ पोलीस ठाणे, नवी मुंबई ठाणे दैनंदिनी नोंद कमांक ४२/२०२६ वेळ १८:५८, दिनांक २८/०१/२०२६ |
| ३ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | | १) श्री. शैलेश घरत, प्रभारी सहा.वसाहत अधिकारी, वय ५७ वर्षे, सिडको कार्यालय नेरूळ, से.नं.३, नवी मुंबई रा. रूम नं. ७०२, प्लॉट नं.२२ व २३, सेक्टर नं.२९, नेरूळ, प्लाटिनम जेनेसिआ, नवी मुंबई,<br>२) श्री. नागेंद्र तुलसीराम पांडे, वय ५८ वर्षे, खाजगी इसम, रा. भुमीराज बिल्डींग, रूम नं. अे १०३, सेक्टर नं.१६, घणसोली, नवी मुंबई |
| ४. | लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ४,००,०००/- तडजोडीअंती रू. २००,०००/- |
| ५ | स्विकारलेली रक्कम | :- | रू. २,००,०००/- |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | तकारदार हे कॉन्ट्रक्टर असून ते सोसायटी रजिस्टेशन तसेच सिडको ट्रान्सफरचे काम करतात. तकारदार यांना अधिकार पत्र प्राप्त असलेल्या सानपाडा येथील सदनिकेचे सिडको ट्रान्सफर करणेकरीता ऑनलाईन पध्दतीने दिनांक ११/०६/२०२५ रोजी तकारदार यांनी सिडको कार्यालयास अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने विभागीय कार्यालय सिडको, नेरूळ येथील प्रभारी सहा.वसाहत अधिकारी शैलेश आत्माराम घरत यांनी सिडको ट्रान्सफरचे काम करून देणे करीता रू. ४,००,०००/- ची मागणी केल्याबाबत तकारदार यांनी दि. २२/०१/२०२६ रोजी लेखी तकार दिली आहे.<br>सदर तकारदार यांचे तकारीचे अनूषंगाने दिनांक २७/०१/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. शैलेश घरत, प्रभारी सहा.वसाहत अधिकारी यांनी खाजगी इसम पांडे यांचे मार्फतीने तडजोडीअंती रू. २,००,०००/- लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निषन्न झाले.<br>त्यानंतर दिनांक २८/०१/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवई दरम्यान लोकसेवक शैलेश घरत, प्रभारी सहा.वसाहत अधिकारी यांचे सांगणेनुसार श्री. पांडे, खाजगी इसम यांनी तकारदार यांचेकडुन रू. २,००,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना हॉटेल नवमी, नेरूळ रेल्वे स्टेशन येथे १४:३८ वा. रंगेहात पकडण्यात आले असून, त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानंतर श्री. शैलेश घरत, प्रभारी सहा.वसाहत अधिकारी यांना सिडको, नेरूळ कार्यालय येथून ताब्यात घेतले आहे. वरील दोन्ही लोकसेकवक यांचे विरुध्द भ्र. प्र.अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा नोंद करण्याची कारवाई सुरु आहे. |
| | | | |

लाचलुचपत प्रतिबंध विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, नवी मुंबई यांचेशी संपर्क करावा.

**मार्गदर्शन अधिकारी:-** मा.श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे
मा. श्री.भागवत सोनावणे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

**संपर्क पत्ता :-** ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी, नवी मुंबई


संकेत स्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in,
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :-१०६४ दुरध्वनी क्र. :-०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
**असेबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क. -२७८३३३४४/७०६६६३५६६६**

( किरणकुमार नामदेव वाघ )
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई


Scanned with OKEN Scanner